# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

## प्रेसनोट

२०२१

गुन्हे शाखा, नवी मुंबई दिनांक ३०.१०.२०२१

**पश्चिम बंगाल येथे फायरींग व धारधार शस्त्राने वार करून खुन करणाऱ्या ३ सराईत गुन्हेगारांना मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई कडुन जेरबंद**

---

माटीया पोलीस स्टेशन, जि. बासिरहाट, पश्चिम बंगाल गुन्हा रजि. क्र. ४१६/२०२१ भादविस कलम ३०२,३०७,३४१, ३२६,२०१,१२०ब सह भारतीय हत्यार कायदा कलम २५/२७ या गुन्हयातील मयत इसम मोफज्जल हफ मंडल उर्फ अक्कु, वय ४० वर्षे, रा. पश्चिम बंगाल याचा दिनांक ०७/१०/२०२१ रोजी अज्ञात इसमांनी अनोळखी कारणावरून त्याचे शरीरावर धारधार शस्त्राने वार करून तसेच त्याचे डोक्यात गोळया घालुन निघृण हत्या केली होती. याबाबत पोलीस उप आयुक्त, गुन्हे यांना नॅशनल टेलीग्राम ग्रुप वरून माहिती प्राप्त झाली होती. त्यानुसार सपोनि. भेदोडकर, मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा यांचेवर सदर जबाबदारी सोपविली असता पोउपनिरी. सौम्य चॅटर्जी, २४ परगना, प. बंगाल यांचे मार्फत सदर गुन्हयातील तीन संशयीत आरोपी हे पनवेल, नवी मुंबई भागात आहेत. अशी माहिती दिनांक १८.१०.२१ रोजी प्राप्त झाली होती. त्यानुसार वरिष्ठांच्या आदेशान्वये सपोनि. भेदोडकर व पथक सतत संशयीत आरोपीचा शोध घेत होते. गोपनिय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहिती वरून व तांत्रिक तपासावरून आरोपीच्या ठाव ठिकाणाची निश्चित माहिती मिळाल्यानंतर सपोनि. भेदोडकर यांनी पोउपनिरी. सौम्य चॅटर्जी, २४ परगना, प. बंगाल संपर्क करून आरोपीच्या ठाव ठिकाणाबाबत माहिती दिल्याने दिनांक २७.१०.२१ रोजी पश्चिम बंगाल माटीया पोलीस स्टेशन, पश्चिम बंगाल येथील पथक मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा येथे दाखल झाले होते. त्यानुसार वरिष्ठांच्या आदेशान्वये मध्यवर्ती कक्षाचे सपोनि. भेदोडकर,पोना/कोपरकर, अजय कदम यांनी पश्चिम बंगाल पोलीसांसोबत नवी मुंबई आयुक्तालय परिसरात सतत दोन दिवस-रात्र संयुक्तरित्या राबविलेल्या सर्च ऑपरेशनमध्ये नमुद गुन्हयातील आरोपी नामे १) शब्बीर गोलम रसुल घरामी, वय ३५ वर्षे, २) रबीऊल खोकोन घरामी, वय ४३ वर्षे, ३) नुर आलम मोफिजुल इस्माल मोंडल, वय २१ वर्षे, तीन्ही मुळ रा. ॲनडुलपोटा, पोस्टे. माटीया, जि. नार्थ २४ परगना, पश्चिम बंगाल यांचा शोध घेवुन शिताफिने त्यांना अटक करण्यात आले आहे.

अटक करण्यात आलेला आरोपी नामे रबीऊल खोकोन घरामी, वय ४३ वर्षे याचेवर खालीलप्रमाणे गंभीर गुन्हे दाखल असुन त्यामध्ये तो **पाहिजे आरोपी असल्याने मा. न्यायालयाने (पश्चिम बंगाल) त्याचेवर स्टॅन्डींग वॉरंट काढले होते.** सदर गुन्हे खालील प्रमाणे आहेत.

१) गुन्हा रजि. क्र. १६७/२०१८ भादविस कलम ३०७,३४१,३२६,३४
२) गुन्हा रजि. क्र. २६०/२०१८ भादविस कलम ३९५,३९७ सह भा.ह.का. कलम २५,२७
३) गुन्हा रजि. क्र. ३९०/२०१८ भादविस कलम ३९९, ४०२ सह भा.ह.कायदा कलम २५(१)( ए ), २७

सदर तीन्ही आरोपींना मा. पनवेल न्यायालयात हजर करून ट्रान्झीट वॉरंट प्राप्त करून पश्चिम बंगाल पोलीस आरोपीसह रवाना झाले.

**सदरची उल्लेखनिय कामगीरी मा. पोलीस आयुक्त,श्री. बिपिन कुमार सिंह, मा. पोलीस सह आयुक्त, डॉ. श्री. जय जाधव, मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. महेश घुर्ये, मा. पोलीस उप आयुक्त,गुन्हे शाखा, श्री. सुरेश मेंगडे व सहा. पोलीस आयुक्त,गुन्हे शाखा, श्री. विनोद चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयसिंह भोसले, सपोनि. ज्ञानेश्वर भेदोडकर, पोना-लक्ष्मण कोपरकर, अजय कदम व पश्चिम बंगाल येथील पोलीस पथक यांनी केली आहे.**

★★★★★★★★★★★